आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२० एप्रिल २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- अठराव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात तुरळक अपवाद वगळता शांततेत मतदान / अंदाजे सरासरी ६४ पूर्णांक ८६ शतांश टक्के मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क

- लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ५ मतदारंसघांसाठी अंदाजे सरासरी ६१ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान, सर्वच ठिकाणी मतदानाचा टक्का घसरला.

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी प्रचाराला वेग / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नांदेड इथं घेतली सभा / राहुल गांधी यांचा उत्तरप्रदेशात प्रचाराचा धडाका

- ओदिशात बोट उलटून झालेल्या अपघातातल्या मृतांची संख्या ७ वर

- भारताकडून ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांची पहिली तुकडी फिलिपाइन्सला सुपूर्द

**आणि**

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपीटल्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना

**<><><><><>**

अठराव्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल तुरळक अपवाद वगळता शांततेत मतदान झालं. २१ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ लोकसभा मतदारसंघांमधे १ हजार ६२५ उमेदवारांचं भवितव्य मतदार यंत्रात नोंदलं गेलं. पहिल्या टप्प्यात अंदाजे सरासरी ६४ पूर्णांक ८६ शतांश टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार लक्षद्वीपमध्ये सर्वात जास्त ८३ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतकं, तर बिहारमध्ये सर्वात कमी ४८ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदान झालं. २०१९च्या तुलनेत अनेक ठिकाणी मतदानाचा टक्का घसरल्याचं पाहायला मिळालं.

**<><><><><>**

पहिल्या टप्प्यात काल महाराष्ट्रातल्या भंडारा गोंदिया, चंद्रपूर, **गडचिरोली-चिमूर, नागपूर आणि रामटेक** या पाच मतदारसंघांसाठी अंदाजे सरासरी ६१ पूर्णांक ८७ शतांश टक्के मतदान झालं. गडचिरोली-चिमूर मतदार संघात सर्वाधिक ७० पूर्णांक ३८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं. या सर्वच मतदारसंघांमध्ये २०१९च्या तुलनेत मतदानात घसरण झाल्याचं दिसलं. २०१९ मध्ये गडचिरोली-चिमूर मतदार संघात ७२ पूर्णांक ३३ शतांश टक्के, तर नागपूर मतदारसंघात ५४ पूर्णांक ४६ टक्के मतदान झालं होतं.

**भंडारा - गोंदिया** मतदार संघात यंदा ६४ पूर्णांक ७२ शतांश टक्के, तर २०१९ मध्ये ६८ पूर्णांक ८१ शतांश टक्के मतदान झालं होतं. चंद्रपूरमध्ये यंदा ६३ पूर्णांक ७ शतांश टक्के तर २०१९ मध्ये ६४ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदान झालं होतं. रामटेक मतदारसंघात यंदा ५९ पूर्णांक ५८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली, २०१९ मध्ये इथे ६२ पूर्णांक ३० शतांश टक्के मतदान झालं होतं.

या टप्प्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह एकूण ९७ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याच्या प्रचारानं देशभरात जोर धरला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी चिकबल्लापूर जिल्ह्यात चोकाहल्ली गाव तसंच बंगरूळूमध्ये पॅलेस ग्राउंड इथं प्रचार सभा घेणार आहेत. या मतदारसंघातल्या सहा उमेदवारांसाठी ते प्रचार सभा घेत आहेत. जनता दल सेक्युलर सुद्धा या प्रचार सभेत सहभागी होणार आहे. काँग्रेस पक्ष सुद्धा आज इथं प्रचार करत आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या मैसूर इथं तर डी के शिवकुमार मंड्या इथं आज सभा घेणार आहेत.

केरळात कोची इथं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी आज प्रचार सभा घेत आहेत. त्या चालकुडी आणि पठानमथीट्टा इथं सभा घेणार आहेत. त्यानंतर

संध्याकाळी दिल्लीला परतण्यापूर्वी थिरुवनंतपूरम इथं त्यांची सभा होणार आहे. मुख्यमंत्री पिनारायी विजयन तसंच कम्युनिस्ट पार्टीचे नेते सिताराम येचुरी हेसुद्धा प्रचारसभा घेणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह आज राजस्थान मधल्या भीलवाड़ा आणि कोटा इथं प्रचारसभा घेणार असून, रोड शोही करणार आहेत. यानंतर ते उत्तर प्रदेशात मथुरा इथं जाहीर सभा घेतील.

काँग्रेस नेते राहुल गांधी आज बिहार मधल्या भागलपूर इथं रोड शो करतील तसंच जाहीर सभा घेतील. या सभेत बिहारचे विरोधी पक्ष नेते तेजस्वी यादव सहभागी होतील. इंडीया आघाडीचे नेते अजित शर्मा यांच्यासाठी ते सभा घेणार आहेत. त्यानंतर राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव अमरोहा इथं संयुक्त रॅली करणार आहेत.

**<><><><><>**

येत्या पाच वर्षांत देशात विकास घडवून आणण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. ते आज नांदेड इथं प्रचारसभेत बोलत होते. आपला पक्ष जी आश्वासनं जनतेसमोर ठेवतो त्याची पूर्तता करून दाखवतो असं त्यांनी सांगितलं. पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं.

**<><><><><>**

दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी दाखल केलेल्या नियमित जामीन याचिकेवर दिल्ली न्यायालयानं आज आपला निर्णय राखून

ठेवला आहे. ३० एप्रिल रोजी आदेश दिला जाईल असं राऊस एव्हेन्यू न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश (पीसी ॲक्ट) कावेरी बावेजा यांनी सांगितलं. सिसोदिया यांना गेल्या वर्षी दारू संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अटक करण्यात आली होती.

<><><><><>

ओदिशात झारसुगुडा जिल्ह्यात महानदी इथं बोट उलटून झालेल्या अपघातातल्या मृतांची संख्या ७ वर पोहोचली आहे. सर्व सातही मृतदेहांची ओळख पटली आहे. बचाव पथक एका बेपत्ता महिलेचा शोध घेत आहे. काल झारसुगुडा जिल्ह्यात लाखनपूर जवळ ५४ प्रवाशांना घेऊन प्रवास करणारी ही बोट महानदीत उलटून हा अपघात झाला. हे सर्व प्रवासी नजीकच्या छत्तीसगड जिल्ह्यातले आहेत.

<><><><><>

भारताने ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांची पहिली तुकडी काल फिलिपाइन्सला दिली. फिलीपिन्स ही क्षेपणास्त्र आधुनिकीकरण कार्यक्रमाच्या सुधारित सशस्त्र दलाच्या होरायझन टू प्रणाली अंतर्गत प्राप्त करत आहे. त्याची उड्डाण श्रेणी २९० किलोमीटरपर्यंत आहे. हे क्षेपणास्त्र जमीन, समुद्र आणि हवेतून भूपृष्ठावर आणि समुद्रावर आधारित लक्ष्यांवर प्रक्षेपित करण्यात सक्षम आहे. जानेवारी २०२२ मध्ये फिलीपिन्सने भारत आणि रशिया यांच्या संयुक्त उपक्रमात अँटी-शिप व्हेरिएंटच्या तीन बॅटरीसाठी भारतासोबत ३७५ दशलक्ष डॉलर्सचा करार केला होता. ब्रह्मोस हा संरक्षण

संशोधन आणि विकास संस्था आणि रशियाच्या एनपीओ मशिनोस्ट्रोएनिया यांचा संयुक्त उपक्रम आहे .

<><><><><>

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्रांची छाननी आज होणार आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात लोकसभेच्या ९४ जागांसाठी १० राज्य आणि २ केंद्रशासित प्रदेशात येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. गुरुवारी चौथ्या टप्प्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची सुरुवात झाली. चौथ्या टप्प्यात लोकसभेच्या ९६ जागांसाठी ९ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशात १३ मे रोजी मतदान होणार आहे.  याबरोबरच, आंध्रप्रदेश विधानसभेच्या १७५ जागांसाठी आणि ओदिशा विधानसभेच्या पहिल्या टप्प्यातल्या २८ जागांच्या निवडणुकांसाठी काल अधिसूचना जाहीर झाली.

<><><><>

उत्तर कोरियाने आज पश्चिम किनारपट्टीच्या भागात सुपर-लार्ज क्रूझ क्षेपणास्त्र वॉरहेड आणि नवीन विमानविरोधी क्षेपणास्त्राची चाचणी घेतली आहे. अमेरीका आणि दक्षिण कोरिया यांच्यात वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्करी क्षमता वाढवत असल्याचं उत्तर कोरियानं म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिकेने पाकिस्तानच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांना लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या ४ कंपन्यांवर आज निर्बंध लादले आहेत. चीनमधील झियान लोंगडे टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट, टियांजिन क्रिएटिव्ह सोर्स इंटरनॅशनल ट्रेड, ग्रॅनपेक्ट कंपनी लिमिटेड आणि बेलारूसमधील मिन्स्क व्हील ट्रॅक्टर प्लांट अशी कंपन्यांची नावे आहेत. या कंपन्या अशा व्यवहारांत आहेत ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर विनाशकारी शस्त्रांचा धोका निर्माण झाला आहे असं अमेरीकेचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर यांनी सांगितलं आहे.

<><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्ली कॅपीटल्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे. दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.
स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात लखनऊ सुपर जाएंट्सनं चेन्नई सुपर किंग्जसवर ८ गडी राखून विजय मिळवला.

//<><><><>//